## L. A. BILL No. XXV OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४. २०२१ चा महा. अध्या. ९.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१, प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अअअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, ‘‘मुख्य अधिनियम’’ असा केला आहे) याच्या कलम ७३अअअ मध्ये, पोट-कलम (३) मधील,— १९६१ चा महा. २४.

(एक) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल आणि ते, २४ मार्च २०२० पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

“ परंतु, जर समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी समाप्त झाला असेल तर, आणि जर संस्थेच्या समितीची निवडणूक, कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांमुळे किंवा संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणामुळे घेतली जाऊ शकली नसेल तर, समितीचे असे सदस्य आणि पदाधिकारी, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, समितीचे सदस्य आणि पदाधिकारी म्हणून नियमितपणे असल्याचे मानण्यात येईल :”;

(दोन) विद्यमान परंतुकामध्ये, “ परंतु ” या मजकुराऐवजी ‘‘परंतु आणखी असे की’’ हा मजकूर दाखल करण्यात येईल.

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**३.** मुख्य अधिनियमात किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, समितीने किंवा समितीच्या सदस्यांनी किंवा तिच्या पदाधिकाऱ्यांनी, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा काढलेल्या आदेशांन्वये किंवा उप-विधिंन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा हाती घेतलेली कोणतीही कारवाई किंवा काढलेला कोणताही आदेश, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) मधील पहिल्या परंतुकाच्या तरतुदी, जणू काही सर्व महत्त्वाच्या वेळी निरंतरपणे अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार, विधिग्राह्यपणे केलेली गोष्ट, हाती घेतलेली कारवाई, किंवा, यथास्थिति, काढलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. २०२१ चा महा. .

२०२१ चा महा. अध्या. ९.

**४.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी–१८५७—२ (५००-१२-२०२१)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.]

**[विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई